**ठळक बातम्या**

- भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत असून अमेरिकन डॉलर वगळता इतर परदेशी चलनांच्या तुलनेत भारतीय रुपयाची घसरण होत नसल्याचं केंद्रीय अर्थमंत्र्यांचं प्रतिपादन
- यंदाच्या अर्थसंकल्पात प्राप्तीकरातल्या सवलती हेच प्रमुख वैशिष्ट्य असल्याची उद्योग जगताची प्रतिक्रीया
- गेल्या महिन्यात वस्तू आणि सेवा कर संकलन एक कोटी ९५ लाख रुपये

**आणि**

- महिला क्रिकेटमध्ये, 19 वर्षांखालची टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धा भारतानं जिंकली

**<><><><><>**

देशातल्या प्रामाणिक करदात्यांमुळे अर्थव्यवस्थेला मोलाचं योगदान मिळत असून त्यांच्याकरता करांमधे सवलत देण्याचं उद्दिष्ट यंदाचा अर्थसंकल्प तयार करताना होतं असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. २०२५-२६ या वर्षाचा अर्थसंकल्प काल संसदेत सादर झाल्याच्या पार्श्वभूमीवर पीटीआय या वृत्तसंस्थेला त्यांनी मुलाखत दिली. करआकारणी सुलभ आणि सोपी असावी, त्यामुळे करभरणा प्रामाणिकपणे करण्याला

प्रोत्साहन मिळतं. भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत असून अमेरिकन डॉलर वगळता इतर परदेशी चलनांच्या तुलनेत भारतीय रुपयाची घसरण होत नाहीये असं त्या या मुलाखतीत स्पष्ट केलं.

**<><><><><>**

यंदाच्या अर्थसंकल्पात जाहीर झालेल्या कर सवलतीं हेच प्रमुख वैशिष्ट्य असल्याची प्रतिक्रीया उद्योग जगतानं व्यक्त केली आहे. १२ लाख रुपयांपर्यंतचं उत्पन्न पूर्णपणे करमुक्त करणं हाच यंदाच्या अर्थसंकल्पातला सर्वात महत्त्वाचा मुद्दा असल्याचं मत उद्योगपती कुमार मंगलम बिर्ला यांनी मांडलं आहे. यामुळे मध्यमवर्गीयांच्या हातात अधिक पैसे येतील, ज्यामुळे वस्तू, दुचाकी आणि प्रवास या क्षेत्राला चालना मिळेल, असं बिर्ला यांनी सांगितलं.

तर, मूलभूत कार्यांसाठी पैसा देणं आणि आर्थिक क्षेत्रात सावधगिरी बाळगायचा प्रयत्न करणं याबाबात सरकार कसोशीनं प्रयत्न करत असल्याचं या अर्थसंकल्पात दिसून येत,असं निरीक्षण वित्त आयोगाचे माजी सल्लागार रथिन रॉय यांनी नोंदवलं आहे.

पर्यटन, चामडे आणि पादत्राणे उद्योग तसंच सागरी क्षेत्राला या अर्थसंकल्पात दिलेलं प्रोत्साहन रोजगारनिर्मितीसाठी फार महत्वाचं ठरेल असं फिक्की चे अध्यक्ष हर्षवर्धन अगरवाल यांनी म्हटलं आहे. करसवलतीची कक्षा ७

लाखांपासून १२ लाखापर्यंत वाढवणे तसेच भांडवली खर्च कायम ठेवणे ही या अर्थसंकल्पाची मोठी वैशिष्ट्ये असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

जानेवारी २०२५ या महिन्यात एक कोटी ९५ लाख रुपये वस्तू आणि सेवा कर महसूल जमा झाला आहे. जानेवारी २०२४ च्या तुलनेत या महिन्यात कर महसूलात १२ पूर्णांक ३ दशांश टक्के वाढ झाली आहे. या महिन्यात केंद्राचं वस्तू आणि सेवा कर संकलन ३६ हजार ७७ कोटी रुपये आणि राज्याचं वस्तू आणि सेवा कर संकलन ४४ हजार ९४२ कोटी रुपये इतकं आहे. एकात्मिक वस्तू आणि सेवा कर संकलन १ लाख कोटी रुपये तर उपकर संकलन १३ हजार ४१२ इतकं आहे.

**<><><><><>**

देशभरात आज वसंत पंचमी साजरी होत आहे. या दिवशी विद्येची देवता सरस्वती देवीची पूजा केली जाते, तसंच वसंत ऋतूचं स्वागत करून निसर्गातील नवनिर्मितीचा उत्सव साजरा केला जातो.

शिक्षण आणि ज्ञानाचं महत्व सांगणारा तसंच समृद्धी आणि आनंदाचा उत्सव साजरा करणारा हा दिवस असून सर्व देशवासियांना शुभेच्छा देत असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी  मुर्मू यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्ट वर लिहिलं आहे.

लवकरच भारत जागतिक स्तरावर ज्ञानाचं केंद्र म्हणून उदयाला येवो अशी प्रार्थना त्यांनी केली आहे.

समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये प्रधानमंत्री मोदी यांनीही देशवासियांना वसंतपंचमीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

पंढरपुरात आज वसंत पंचमीच्या मुहूर्तावर विठ्ठल-रुख्मीणीचा विवाह सोहळा झाला. यावेळी रुख्मिणीला शुभ्र वस्त्र, मोत्याचे दागिने, अलंकार परिधान करण्यात आले होते. विविध अलंकारांनी नटलेल्या मूर्ती विठ्ठल आणि रखुमाईच्या शाही मंडपात आणण्यात आल्या, तिथं भाविकांच्या उपस्थितीत मंगलाष्टकांच्या घोषात दोन्ही देवतांचं लग्न लागलं. सोहळ्यानंतर सर्व भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमध्ये 19 वर्षांखालील टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेतल्या अंतिम सामन्यात, भारतानं दक्षिण आफ्रिकेवर ९ खेळाडू राखून दणदणीत विजय मिळवून विश्वचषकावर आपलं नाव कोरलं. दक्षिण आफ्रिकेचं ८३ धावांचं आव्हान भारातनं एका बळीच्या बदल्यात बाराव्या षटकात पूर्ण केलं. भारताची फलंदाज गोंगदी त्रिशा हिने नाबाद ४४ तर सानिका चाळकेनं नाबाद २६ धावांची खेळी करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं.

त्याआधी प्रथम फलंदाजीसाठी आलेला दक्षिण आफ्रिकेचा संघ फारशी चमकदार खेळी करू शकला नाही. अवघ्या ८२ धावा करून दक्षिण आफ्रिकेचे सर्व फलंदाज तंबूत परतले. माईक वॅन वुर्स्ट च्या २३,  जेम्मा बोथाच्या १६ आणि फे कॉवलिंग हिच्या १५ धावा सोडल्या  इतर कुठल्याही फलंदाजाला  दुहेरी धावसंख्याही पार करता आली नाही. भारताच्या गोंगदी त्रिशानं सर्वाधिक तीन गडी बाद केले. तर पारुनिका सिसोदिया,आयुषी शुक्ला आणि वैष्णवी शर्मा यांनी प्रत्येकी दोन आणि शबनम शकिल हिनं एक गडी बाद केला.  गोंगदी त्रिशा हिला सामना वीर आणि मालिका वीर म्हणून गौरवण्यात आलं.

<><><><><>

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या टी-२० क्रिकेट मालिकेतला पाचवा आणि शेवटचा सामना आज संध्याकाळी मुंबईत खेळला जाणार आहे. या मालिकेतभारताने ३-१ अशी विजयी आघाडी घेतली आहे. दरम्यान, टी-२० मालिकेनंतर दोन्ही संघांमध्ये तीन एकदिवसीय सामने होणार आहेत.

<><><><><>

नेदरलँड्स इथे सुरु असलेल्या टाटा मास्टर्स बुद्धिबळ स्पर्धेच्या अंतिम फेरीत आता  विश्वविजेता डोम्मराजू गुकेश आणि ग्रँडमास्टर प्रज्ञानंद हे दोघे आमने सामने आले असून अंतिम  सामना त्या दोघांमध्ये होईल.

उपांत्य फेरीत काल प्रज्ञानंद ने सर्बियाच्या अलेक्सी सरेना याचा पराभव केला , तर नेदरलँड्स च्या जॉर्डन व्हॅन फॉरिस्ट शी झालेला सामना गुकेशने बरोबरीत सोडवला होता.

<><><><><>

उत्तराखंडमधे सुरु असलेल्या 38व्या राष्ट्रीय क्रीडास्पर्धांमधे आतापर्यंत महाराष्ट्राने सर्वाधिक ४१ पदकं मिळवली असून त्यात ११ सुवर्णपदकं आहेत. सेनादलांचा संघ सर्वाधिक १४ सुवर्णपदकं मिळवून अव्वल स्थानी आहे. कर्नाटक १३ सुवर्णपदकांसह २३ पदकं मिळवून दुसऱ्या स्थानावर आहे. स्क्वॅशचा अंतिम सामना महाराष्ट्र आणि तमिळनाडूमधे सुरु आहे.

<><><><><>

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज अंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी एका प्रवाशाकडून काल एक किलो ६४९ ग्रॅम वजनाचे अंमली पदार्थ जप्त केले. त्याचं आंतरराषट्रीय बाजार पेठेतलं मूल्य अंदाजे १६ कोटी ४९ लाख रुपये इतकं आहे. पॅरिसमार्गे मुंबईला आलेल्या प्रवाशाकडून पांढऱ्या रंगाच्या १७० कॅप्सूल जप्त करण्यात आल्या, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

<><><><><>

नाशिकजवळ सिन्नर इथे काल पहाटे झालेल्या इनोव्हा आणि डंपर च्या अपघातात इनोव्हातल्या तीन प्रवाशांचा मृत्यू झाला असून १ जण गंभीर जखमी आहे. रत्नागिरीचे रहिवासी असलेले हे प्रवासी कुंभमेळ्यात अमृतस्नान करून परत येत असताना सिन्नरजवळ त्यांच्या गाडीला समोरून येणाऱ्या डंपरने धडक दिली. महामार्गावर प्रवास करणाऱ्या इतर वाहनचालकांनी थांबून त्यांना मदत केली. दोन प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला तर तिसऱ्या प्रवाशाचा रुग्णालयात नेल्यानंतर मृत्यू झाला.

**<><><><><>**

गुजरातच्या डांग जिल्ह्यात सापुतारा घाटात दोनशे फूट दरीत बस कोसळून आज झालेल्या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला, तर १७ जण जखमी झाले आहेत. ही बस भाविकांना घेऊन महाराष्ट्रातल्या त्र्यंबकेश्वर इथून गुजरातमधल्या द्वारका इथं जात होती. सर्व भाविक मध्यप्रदेशातले रहिवासी आहेत. जखमी प्रवाशांना अहवा इथल्या रुग्णालयात दाखल केल्याचं पोलिसांनी सांगितलं.

**<><><><><>**

आज जागतिक पाणथळ जागा दिन आहे. अशा जागांचं संरक्षण आणि त्याबाबतची आस्था व्यक्त करण्यासाठी हा दिवस साजरा करायची प्रथा १९७१ सालापासून सुरु आहे. इराणच्या रामसर शहरात २ फेब्रुवारी

१९७१ रोजी या दिवसानिमित्त पहिलं रामसर अधिवेशन झालं होतं. वनस्पती आणि इतर सूक्ष्म जीवांचा अधिवास असलेल्या जल परिसंस्था या केवळ जलसाठेच नव्हेत तर संपूर्ण पर्यावरणाला विपुल प्रमाणात पर्यावरणीय आरोग्य प्रदान करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.

<><><><><>

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळानं ७८ व्या कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात सहभागी होण्यासाठी फिल्म बाजार-२०२५ मध्ये सहभागी होण्यासाठी मराठी चित्रपटांकडून प्रवेशिका मागवल्या आहेत. १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत सेन्सॉर प्रमाणपत्र प्राप्त झालेले मराठी चित्रपट यात सहभागी व्हायला पात्र असतील.

<><><><><>

सांस्कृतिक मंत्रालयानं आकाशवाणीच्या सहकार्यानं आज नवी दिल्लीतल्या आकाशवाणी भवन इथं 'हर कंठ में भारत' हा संगीताचा विशेष कार्यक्रम सुरू केला. हा कार्यक्रम आजपासून १६ फेब्रुवारीपर्यंत दररोज २१ आकाशवाणी केंद्रांवरून सकाळी साडेनऊ ते साडेदहा पर्यंत थेट प्रक्षेपित केला जाईल. सांस्कृतिक मंत्रालयाचे सचिव अरुणिश चावला आणि प्रसार भारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यांनी या कार्यक्रमाचं उद्घाटन केलं.

आकाशवाणीच्या महासंचालक डॉ. प्रज्ञा पालीवाल गौर याही यावेळी उपस्थित होत्या.

**//<><><><><>//**